



# खबर

से हकिकत तक

KHABAR SE HAKIKAT TAK

विठु नामाचा गजर व्हावा

● WEBSITE : https://khabarsehakikattak.in
● Email : shirishkumarsherkhane@gmail.com

▮ संपादक : शिरीषकुमार तुकाराम शेरखाने, मो.९०४९८४४४१२    ▮ कार्यकारी संपादक : ॲड.चंद्रशेखर धोत्रे, मुंबई

लातूर    मराठी    साप्ताहिक    वर्ष २ रे.    अंक ०५ वा.    सोमवार दि.०८ ते १४ जुलै २०२४    RNI No. : MAHMAR/2023/86200    किंमत २ रूपये    पाने : ४




## रेणापूर येथील श्री रेणुकादेवी मंदिर परिसरातील भक्तनिवास बांधकामाची आ.रमेशआप्पा कराड यांच्याकडून पाहणी

लातूर – रेणापूर येथील असंख्य भाविकांचे श्रद्धास्थान असलेल्या आदिशक्ती श्री रेणुका देवी मंदिर परिसरात कोट्यावधी रुपये खर्चाच्या भक्तनिवास बांधकामासह इतर सुरू असलेल्या विकास कामांची पाहणी करून भाजपा नेते आ. रमेशआप्पा कराड यांनी समाधान व्यक्त केले.

श्री रेणुका देवी मंदिर तीर्थक्षेत्रास शासनाचा 'ब' दर्जा मिळाला आहे. या मंदिर परिसरात भाविक भक्ताना सोयी सुविधा मिळाव्यात यासाठी भाजपाचे नेते आ. रमेशआप्पा कराड यांनी शासनाच्या नगरविकास विभागाकडून भक्तनिवास बांधकामा करिता तब्बल एक कोटी रुपयाचा निधी उपलब्ध करून दिला होता. सदरील निधीतून अत्यंत देखणे आणि सर्व सोयीने युक्त भक्त निवास बांधकाम पूर्णत्वास आले आहे. या कामासह नव्याने मंजूर झालेल्या तीन कोटी रुपये खर्चाच्या भक्त निवास, दर्शन रांग आणि प्रसादालय या नियोजित कामाची



पाहणी आ रमेशआप्पा कराड यांनी केली. सुरू असलेल्या कामाबद्दल समाधान व्यक्त करून होणारी कामेही दर्जेदार व्हावीत अशी अपेक्षा यावेळी त्यांनी व्यक्त केली.मंदिर परिसरात येताच आ. कराड यांनी श्री रेणुका मातेची आरती करून मनोभावे दर्शन घेतले. यावेळी मंदिर ट्रस्टच्या अध्यक्ष तथा तहसीलदार मंजुषा भगत, सहअध्यक्ष राम पाटील, बापू गिरी, दिलीप आकनगिरे यांनी तसेच शहर भाजपाच्या वतीने आ. रमेशआप्पा कराड यांचा यथोचित सत्कार करून आभार व्यक्त केले. यावेळी भाजपाचे अनिल भिसे, ॲड दशरथ सरवदे , रेणापूरचे पहिले नगराध्यक्ष अभिषेक आकनगिरे, संगायो समिती अध्यक्ष वसंत करमुडे, चंद्रकांत कातळे, शरद दरेकर, श्रीकृष्ण पवार, अच्युत कातळे, संतोष राठोड, विजय चव्हाण, दत्ता सरवदे, उत्तम चव्हाण, शेख अजीम, राजकुमार आलापुरे, उज्वल कांबळे, लखन आवळे, नरसिंग येलगटे, महेश गाडे, अंतराम चव्हाण, दिलीप चव्हाण, रमेश चव्हाण, हनुमंत भालेराव, सचिन शिरसकर, गणेश चव्हाण, मनोज चक्रे, जगन्नाथ कातळे, नंदू बंडे, गणेश माळेगावकर, सुरज फुलारी, रोहित खुमसे, नंदकुमार मोटेगावकर, गणेश चव्हाण, महेश वरवटे व्यंकट आकनगिरे, यांच्यासह भाजपाचे कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## सर्व समाज घटकांसाठी चांगल्या मूलभूत सुविधांच्या निर्मितीला प्राधान्य-क्रीडा व युवक कल्याण मंत्री संजय बनसोडे

लातूर : जळकोट नगरपंचायत अंतर्गत वैशिष्ट्यपूर्ण योजनेतून लक्ष्मीपती बालाजी मंदिर सांस्कृतिक सभागृह आणि साहित्यरत्न लोकशाहीर अण्णाभाऊ साठे सांस्कृतिक सभागृहाची उभारणी करण्यात आली आहे. या दोन्ही सभागृहांचे क्रीडा व युवक कल्याण मंत्री संजय बनसोडे यांच्या हस्ते लोकार्पण झाले. सर्व समाज घटकांना चांगल्या मूलभूत सुविधा उपलब्ध करून देण्यास प्राधान्य दिले. याकरिता जळकोट तालुक्यातील विकास कामांसाठी भरीव निधी उपलब्ध करून दिला. यापुढेही आणखी निधी मिळवून देण्याचा आपला प्रयत्न राहणार असल्याचे ना. बनसोडे यांनी यावेळी सांगितले.

जळकोट नगरपंचायतच्या नगराध्यक्ष प्रभावती कांबळे, उपनगराध्यक्ष




मन्मथअप्पा किडे, उदगीरचे उपविभागीय अधिकारी सुशांत शिंदे, जळकोटच्या तहसीलदार सुरेखा स्वामी, नगरपंचायतीचे प्रभारी मुख्याधिकारी रामदास कोकरे, गट विकास अधिकारी नरेंद्र मेडेवार, सार्वजानिक बांधकाम विभागाचे श्री. देशपांडे, श्री. कोरडे, कृषि उत्पन्न बाजार समितीचे सभापती विठ्ठल चव्हाण, उपसभापती संतोष तीडके, नगरपंचायत गटनेते ॲड. तात्या पाटील, लक्ष्मीपती बालाजी मंदिर संस्थानचे रमाकांत रायवार यांच्यासह (पान २ वर)

## आपल्या राष्ट्राचे भवितव्य निर्भय करणे हे जागरुक नागरिकांचे प्रमुख कर्तव्य आहे-रामकुमार रायवाडीकर

लातूर : आपल्या देशाचे भवितव्य निर्भय करणे हे येथील, प्रत्येक जागरूक नागरिकांचे प्रमुख कर्तव्य आहे असे मत, ज्येष्ठ सामाजिक कार्यकर्ते रामकुमार रायवाडीकर यांनी व्यक्त केले. ते २ जुलै रोजी बालाजीनगर–रेड्डी कॉलनी लातूर येथे, सुमेधा महिला पारिवाराच्यावतीने एका सार्वजनिक खुल्या जागेवर, आयोजित करण्यात आलेल्या सामूहिक वृक्षारोपन कार्यक्रमामध्ये प्रमुख पाहुणे म्हणून बोलत होते. या सामाजिक समारंभाच्या अध्यक्षस्थानी श्री पंडितराव व्यंकटराव बंडे हे होते.



यावेळी उपस्थित नागरिक व कार्यकर्त्यांना संबोधित करताना रामकुमार रायवाडीकर म्हणाले पुढे की, देशातील आजचे चित्र फारसे समाधानकारक नाही. व्यक्ती आणि समाजा–समाजात अस्वस्थता आहे. (पान २ वर)

## लातूरला स्वतंत्र विद्यापीठासाठी, आम्ही लातूरकर विद्यापीठ निर्माण कृती समितीच्यावतीने लक्षवेधी निदर्शने



**लातूर(प्रतिनिधी):** लातूर जिल्हयाची शिक्षण क्षेत्रातील भरारी पाहता, आम्ही लातूरकर विद्यापीठ निर्माण कृती समितीच्यावतीने लातूरला स्वतंत्र विद्यापीठाची मागणी शासन दरबारी वेळोवेळी लावून धरलेली आहे. माजी मुख्यमंत्री तथा लोकनेते विलासरावजी देशमुख यांच्या प्रयत्नातून २००७ मध्ये स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ नांदेड अंतर्गत सुरु करण्यात आले आहे त्याच धर्तीवर लातूर येथे शैक्षणिक गुणवत्तेवर विद्यापीठ मागणी गेल्या अनेक वर्षांपासून आम्ही लातूरकर विद्यापीठ निर्माण कृती समितीच्या वतीने करण्यात आलेली आहे. लातूरकराच्या आग्रही मागणीतून व लातूरचे सुपुत्र (पान २ वर)

## धनगर समाजाच्या आमरण उपोषणकर्त्याची आ.कराड यांनी भेट घेऊन दिला जाहीर पाठिंबा

लातूर – धनगर समाजाचा एस. टी. प्रवर्गात समावेश करावा यासह विविध समाजाच्या हितासाठी आमरण उपोषणास बसलेल्या अनिल गोयकर आणि चंद्रकांत हजारे यांची शनिवारी सायंकाळी भेट घेऊन भाजपाचे नेते आ. रमेशआप्पा कराड यांनी जाहीर पाठिंबा देऊन समाजाच्या न्याय हक्कासाठी आपण या लढ्यात खंबीरपणे सोबत राहून यश मिळवून देण्याचा प्रयत्न करू असे बोलून दाखविले. धनगर समाजाला एसटी प्रवर्गातून आरक्षण मिळावे यासाठी अनेक वर्षापासून लढा सुरू आहे. या




प्रमुख मागणीसह छत्रपती संभाजी नगर जिल्ह्यातील खिल्लारे कुटुंबीयांचे धनगर प्रमाणपत्र रद्द करावे या मागणीसाठी लातूर येथील राजमाता अहिल्यादेवी होळकर चौक येथे अनिल गोयकर आणि चंद्रकांत हजारे यांनी गेल्या २८ जून २०२४ रोजी पासून अमरण उपोषण सुरू केले आहे. (पान २ वर)

## शिक्षकांनी विद्यार्थीकेंद्रित शिक्षणाला महत्त्व द्यावे-सुधाकर तेलंग

लातूर – शिक्षण प्रत्येकामध्ये नागरी आणि सामाजिक जबाबदारी रुजवते. शिक्षण हा मानवी विकासाचा अत्यावश्यक पैलू आहे. हा पैलू डोळ्यांसमोर ठेवून विद्यार्थ्यांच्या सर्वांगिण विकासाला प्राधान्य द्यावे. शिक्षकांनी अध्यापनाचे कार्य करताना विद्यार्थीकेंद्रित शिक्षणाला महत्त्व द्यावे, असे आवाहन लातूर विभागीय शिक्षण मंडळाचे अध्यक्ष सुधाकर तेलंग यांनी केले. येथील महाराष्ट्र शिक्षण मंडळ या संस्थेला 'नवभारत'च्यावतीने 'बेस्ट इन्स्टिट्यूट फॉर इमेज डेव्हलपमेंट ग्रोमिंग इन महाराष्ट्र' हा पुरस्कार मिळाल्याबद्दल संस्थेचे सचिव प्राचार्य डी. एन.




केंद्रे यांचा राजमाता जिजामाता शैक्षणिक संकुलाच्यावतीने गुरुवारी सत्कार करण्यात आला, त्यावेळी अध्यक्षीय भाषणात तेलंग बोलत होते. यावेळी प्रमुख पाहुणे म्हणून शिक्षण सहसंचालक दत्तात्रय मठपती, माध्यमिक विभागाचे शिक्षणाधिकारी नागेश मापारी यांची उपस्थिती होती. मंचावर संस्थेच्या अध्यक्षा के. ए. जायेभाये, प्राचार्य संगमेश्वर केंद्रे, उपप्राचार्या कविता केंद्रे, मुख्याध्यापिका स्वाती केंद्रे, समन्वयक अश्विनी केंद्रे व वैशाली केंद्रे, संस्थेच्या सदस्य स्वाती घुले, राजेंद्र जायेभाये, प्राचार्य जी. आर. मुंडे, राजीव मुंढे उपस्थित होते. यावेळी तेलंग म्हणाले, (पान २ वर)

## ज्ञानेश्वर विद्यालयात सेवापुर्ती गौरव सोहळा संपन्न



लातूर : ज्ञानेश्वर विद्यालयामध्ये– कार्यरत सहा कर्मचा–यांचा सेवापुर्ती निमीत्त गौरव सोहळा संपन्न झाला. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी संस्थेचे अध्यक्ष श्री विक्रमजी गणपतराव गोजमगुंडे साहेब तर प्रमुख पाहुणे म्हणुन संस्थ्ेचे सचिव मा.श्री. डी.एन. दादा शेळके हे उपस्थित होते. तसेच व्यासपीठावर उपाध्यक्ष प्रल्हादराव दुडीले, संचालक डॉ.एस एन जटाळ, प्रा. प्रकाशराव शिंगडे, नाथराव कोल्हे, माधवराव गोलावार मुख्याध्यापक संजय मलवाडे उपमुख्याध्यापक माधव क्षीरसागर पर्यवेक्षक हणमंत बैनगिरे व पुनम पाटील आदी उपस्थित होते.

'सर्व सेवानिवृत कर्मचा–यांनी समर्पित भावनेने काम करून शैक्षणिक क्षेत्रात महत्वपुर्ण योगदान दिलेले आहे' असे प्रतिपादन संस्थ्ेचे अध्यक्ष विक्रमजी गोजमगुंडे यांनी व्यक्त केले. ज्ञानेश्वर विदयालय,लातूर येथील सेवानिवृत्त मुख्याध्यासक सोपान वाघमारे, श्रीमती मीना नरहरे , मुख्यलिपीक सुभाष कोरे , प्रा.भांबरे पी सी, प्रा. शिंदे एल टी, प्रा काडवदे व्ही एस यांच्या सत्कार समारंभ प्रसंगी ते बोलत होते. याप्रसंगी सेवानिवृत्तीनिमित्त सर्व कर्मचाऱ्यांचा सपत्नीक संस्थेवतर्फे ,विदयालयातर्फे तसेच पतसंस्थेयतर्फे यथोचित सत्कार करण्यात आला व त्यांना व त्यांच्या कुटुंबीयांना भावी आयुष्यासाठी शुभेच्छा देण्यात आल्या. कार्यक्रमाचे प्रास्ताविक मुख्याध्यापक संजय मलवाडे यांनी केले सुत्रसंचलन श्रीमती अनिगुंठे एम.एल. यांनी केले तर आभार दिपक गायकवाड यांनी मानले. याप्रसंगी विद्यालयातील शिक्षक, कर्मचारी, विदयार्थी, पालक, मित्रमंडळी, नातेवाईक आदींची मोठया संख्येने उपस्थिती होती.

### पाऊले चालती पंढरीची वाट, सोबत वैद्यकीय सेवेची भेट

## मागील १९ वर्षापासून विवेकानंद हॉस्पिटल पंढरीच्या वारीत मोफत सेवा देण्याचा ऐतिहासिक उपक्रम

लातूर(प्रतिनिधी):



सामान्य माणसाच्या आयुष्यातील डॉक्टरांचे स्थान म्हणजे दुसरा भगवंतच. आपले आरोग्य मोठ्या विश्वासाने सांभाळणारा जनु दुसरा कुबेरच. आजारी माणसाच्या मनामध्ये डॉक्टरांना अत्यंत मानाचे आणि श्रद्धेचे स्थान असते. काही मंडळी तर डॉक्टरांच्या क्लिनिकमध्ये आल्याबरोबर रुग्णांमध्ये नवचैतन्य निर्माण होत असते. आणि दिलासा मिळतो. डॉक्टरचा व्यवसाय म्हणजे एक प्रकारचे वृत्तच आहे. धन्वंतरीच्या आशीर्वादाने आपल्या ज्ञानाचा सदुपयोग करून विज्ञान आणि औषधाच्या साह्याने रुग्णाला ते नवी संजीवनीच बहाल करत असतात. राम (पान २ वर)

## प्राचार्य डॉ.नागोराव कुंभार यांना फुले-आंबेडकर साहित्य पुरस्कार

लातूर : येथील महात्मा बसवेश्वर महाविद्यालयाचे सेवानिवृत्त प्राचार्य, स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठाच्या सामाजिक शास्त्र विद्याशाखेचे पहिले अधिष्ठाता (डीन) आणि विद्यापीठाच्या पहिल्या व्यवस्थापन परिषदेचे सदस्य व महाराष्ट्रामध्ये वैचारिक साहित्याला वाहिलेल्या विचारशलाका या त्रैमासिकाचे संपादक प्राचार्य डॉ. नागोराव कुंभार यांना सातारा येथील भारतीय भटके विमुक्त विकास व संशोधन संस्था व फुले–आंबेडकर साहित्य पंचायत, सातारा या संस्थांच्यावतीने देण्यात येणारा २०२३–२४चा फुले–आंबेडकर साहित्य पुरस्कार जाहीर झाला



आहे अशी घोषणा भटक्या विमुक्त जमाती संघटनेचे अध्यक्ष सुप्रसिद्ध साहित्यिक माजी आमदार लक्ष्मण माने यांनी केली आहे.

या पुरस्काराचे वितरण संस्थेचे अध्यक्ष आणि देशातील जेष्ठ नेते खासदार शरद पवार यांच्या शुभ हस्ते ०९ जुलै २०२४ रोजी सकाळी दहा वाजता शारदाश्रम जकातवाडी, सातारा येथे होणार आहे. या समारंभाचे अध्यक्षस्थान माजी खासदार श्रीनिवास पाटील हे भूषविणार आहेत. भारतीय भटके–विमुक्त विकास व संशोधन संस्था व फुले–आंबेडकर साहित्य पंचायत या संस्थांच्यावतीने दरवर्षी या पुरस्काराचे (पान २ वर)

## दयानंद विज्ञान कनिष्ठ महाविद्यालयाचा विद्यार्थी-पालक मेळावा संपन्न

लातूर : येथील गुणवत्तेची पंढरी म्हणून सर्वपरिचित असलेल्या दयानंद शिक्षण संस्थेच्या दयानंद विज्ञान कनिष्ठ महाविद्यालयाच्या वतीने दि.०३ जुलै २०२४ रोजी दयानंद शिक्षण संस्थेच्या दयानंद सभागृहात ११ वी प्रवेशित विद्यार्थी – पालक मेळावा २०२४–२५ चे आयोजन करण्यात आलेले होते.

या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी दयानंद विज्ञान वरिष्ठ महाविद्यालयाचे उपप्राचार्य डॉ.सिद्धेश्वर बेल्लाळे होते.याप्रसंगी दयानंद विज्ञान कनिष्ठ महाविद्यालयाचे उपप्राचार्य प्रा.भाऊसाहेब सरवदे,पर्यवेक्षिका

### विद्यार्थी–पालकांचा अभुतपूर्व प्रतिसाद




व नीट विभाग समन्वयक डॉ.वैशाली पाटील,पर्यवेक्षिका डॉ. संध्या कोल्हे,एमएचटी–सीईटी विभाग समन्वयक प्रा.कविता जाधव, जेईई विभाग समन्वयक प्रा.रवीकुमार,पालक प्रतिनिधी सरोज घेवारे यांची प्रमुख उपस्थिती होती.

याप्रसंगी उपप्राचार्य डॉ. सिद्धेश्वर बेल्लाळे असे म्हणाले की,दयानंद शिक्षण संस्था ही गुणवत्तेची उज्वल (पान २ वर)

## संपादकीय....



# पंढरीची वारी, जीवनाला देई उभारी

''टाळी वाजवावी गुढी उभारावी
वाट ती चालावी पंढरीची''



पावसाळा सुरु झाला की आषाढात पालख्यांचे वेध लागतात. आषाढातली ही एकादशी आणि तिची वारी हे वारकर्याचं व्रत आहे. संतश्रेष्ठ ज्ञानेश्वर महाराज व संत तुकाराम महाराज यांचा पालखी सोहळा हा महाराष्ट्राच्या सांस्कृतिक व धार्मिक लोकजीवनाचे वैभव आहे. ज्ञानेश्वर, तुकाराम महाराजांच्या पादूका मिरवत या दिंड्या कैवल्याच्या पुतळ्याला भेटायला येतात. आषाढी-कार्तिकीला 'पंढरपुरा नेईन गुढी' म्हणत. सर्व महाराष्ट्रातून दिंडया येतात. अगदी कर्नाटकातून, गोव्यातूनही दिंडया येतात. नदी अनंत अडचणी आल्या तरी सर्वांना जीवन देत पुढे सागराशी एकरूप होण्यास आतुर झालेली असते तशीच ही विठ्ठल भक्तीची गंगा, चंद्रभागेच्या काठाशी असणार्या पंढरीच्या विठ्ठलाशी एकरूप होते ती वारकरी सोहळ्याच्या रूपात.

हा अध्यात्मिक सुखाचा प्रवाह आहे. वारी हे एक व्रत आहे. संस्कार आहे. अट्टहासाने जोडलेला सद्गुण आहे. एकात्मतेची गंगोत्री आहे. वारी हा भगवतभक्तीचा नुसता अविष्कार असून मुक्तीतील आत्मनंदाचा आणि भक्तीतील प्रेमसुखाचा अनुभव आहे. कारण वारकरी हा भागवत संप्रदाय आहे. या संप्रदायाची शिकवण अगदी साधी-सोपी आहे. प्रत्येकाने आपला व्यवसाय करावा, स्वधर्माचे पालन करावे पण हे करतांना पांडूरंगाचे स्मरण करावे हीच भक्ती. त्यात कोणी उच्च नीच नव्हते, कोण्या एका जातीचे संत नाहीत. संतकवी कोण्या एका गावाचे नाही घराण्याचेही नाहीत.

सेना-न्हावी, सावता 'माळी', नामा 'शिंपी', गोरा 'कुंभार, नरहरी 'सोनार' कान्होपागा 'वारांगना', एकनाथ 'ब्राह्मण', तर चोखा 'महार'! अशी एकात्मतेती शिकवण. विठ्ठलाच्या गावा जावे! विठ्ठलरूप व्हावे हेच सत्य. विठ्ठलाला माऊली मानणार्या या संताच्या मनात विठ्ठल ही प्रेम-वात्सल्याची मुर्ती आहे. सासुरवाशीण मुलगी माहेराला जाते. प्रतिवर्षी या प्रेमसुखाच्या माहेराला जाण्यसाठी सकल संताची मांदियाळी वैष्णवांसह पंढरपुरी जायला निघते. जागोजाग मुक्काम करीत पायी पंढरपुरास पोहचते. एका अर्थी ही संत साहित्य संमेलने होतात. चर्चा होतात. अनुभवी, अभ्यासू वारकर्यांची कीर्तने होतात. त्यातून टाळकर्यांचे सहज शिक्षण होते. वारीची ही वाट संतानी दाखविली. आणि याच मार्गावरून वाटचाल करीत जीवनालाच सदाचारी बनविले. हा मार्ग अनुभवसिद्ध आहे.

अहो! एखादी सहल काढायची तर किती तयारी, विचार करावा लागतो जेवढी सहलीला येणार्यांची संख्या जास्त तेवढा तणाव अजून वाढतो. पण वारीचं तसं नाही वारी ठराविक तिथीला निघते आषाढीला पोहचते. कोणाला निमंत्रण नाही. वर्गणी नाही. सक्ती नाही. पण विणेकर्याच्या भोवती दिडींचा आराखडा. रांगा किती, महिला किती, महिला वारकरी कुठं, सगळं काही ठरवल्यासारखं. 'गोपालकाल्यात' सर्वांच्या शिदोर्या एक करतात आणि नंतर वाटून घेतात, नकळत एकमेकांची प्रांपचिक दु:खेही वाटून घेतात.

## सर्व समाज घटकांसाठी चांगल्या मूलभूत सुविधांच्या निर्मितीला ...

(पान १ वरून) नगरपंचायतीचे नगरसेवक, समिती प्रमुख यांची यावेळी प्रमुख उपस्थिती होती. जळकोट तालुक्यातील पिण्याच्या पाण्याचा प्रश्न सोडवण्यासाठी वॉटर ग्रीड योजनेत या तालुक्याचा समावेश करण्यात आला आहे. शेतीला सिंचनाची सुविधा उपलब्ध करून देण्यासाठी तिरू नदीवर बॅरेजसची उभारणी करण्यात आली आहे. यासोबतच विविध समाजाच्या भवनांची उभारणी करण्यात येत असून महापुरुषांच्या पुतळ्यासाठीही निधी मंजूर करण्यात आला आहे. लिंगायत स्मशानभूमीच्या जमिनीचा विषय अंतिम टप्प्यात असून कोमटी समाज स्मशानभूमीसाठीही लवकरच निधी उपलब्ध होईल. तसेच जळकोट शहरातील प्रत्येक प्रभागातील पायाभूत सुविधांसाठी अधिकाधिक निधी उपलब्ध करून देण्यात येईल, असे ना. बनसोडे यांनी सांगितले. तसेच जळकोट आणि उदगीर तालुक्यातील विविध विकास कामे अंतिम टप्प्यात असून या कामांचे लवकरच लोकार्पण होणार असल्याचे त्यांनी सांगितले.

राज्य सरकारने अर्थसंकल्पामध्ये सर्वसामान्य नागरिकांसाठी अनेक महत्त्वपूर्ण योजना जाहीर केल्या आहेत. शेतकऱ्यांना कृषिपंपासाठी मोफत वीज देण्यात येणार आहे. मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजनेतून दरमहा १५०० रुपये दिले जाणार आहेत. या योजनेचा जास्तीत जास्त महिलांनी लाभ घेण्याचे आवाहन ना. बनसोडे यांनी केले. प्रारंभी ना. बनसोडे यांच्या हस्ते लक्ष्मीपती बालाजी मंदिर सांस्कृतिक सभागृहाची कोनशिला अनावरण करून लोकार्पण करण्यात आले. या सभागृहासाठी जळकोट नगरपंचायत अंतर्गत वैशिष्ट्यपूर्ण योजनेंतर्गत ५० लाख रुपये निधी उपलब्ध करून देण्यात आला. यातून जवळपास २५५० चौरस फुटांचा सुसज्ज सभामंडप बांधण्यात आला आहे.

जळकोट शहरात नगरपंचायत वैशिष्ट्यपूर्ण योजनेंतर्गत साहित्यरत्न लोकशाहीर अण्णाभाऊ साठे सांस्कृतिक सभागृह बांधण्यात आले आहे. यामध्ये जवळपास १३५० चौरस फुटांचा सुसज्ज हॉल, प्रसाधनगृहे, पाणी पुरवठा, अंतर्गत पाणी व्यवस्था, इमारतीमध्ये आणि इमारत परीसरात विद्युतीकरण व प्रकाश योजना करण्यात आली आहे. या कामासाठी १ कोटी रुपये निधी मंजूर करण्यात आला होता. या सभागृहाचे ना. बनसोडे यांनी लोकार्पण केले.

# एसटीचे विभागीय यंत्र अभियंता मंगेश कांबळे यांची बदली

## नांदेड आगाराच्यावतीने निरोप समारंभ



नांदेड- महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळ नांदेड विभागाचे विभागीय यंत्र अभियंता (चालन ) मा. श्री. मंगेश रामाराव कांबळे यांची नांदेड विभागात ६ वर्षे प्रवाशी सेवेमध्ये प्रदीर्घ सेवेनंतर यंत्र अभियांत्रिकी खाते मध्यवर्ती कार्यालय सेंट्रल मुंबई येथे बदली झाल्याबद्दल त्यांचा एसटी डेपो नांदेड आगाराच्यावतीने दि. ०६ जुलै २०२४ शनिवार रोजी आगार कामगार कर्मचाऱ्यांच्यावतीने दुपारी ठिक ४ वाजता त्यांचा हृदय सत्कार करुन शुभेच्छारूपी निरोप देण्यात आला.

सर्वप्रथम आगार व्यवस्थापक मा. श्री. अनिकेत बल्लाळ यांच्या हस्ते त्यांचा शाल, श्रीफळ, पुष्पहार देऊन हृदय सत्कार करुन शुभेच्छारुपी बदलीसंदर्भात निरोप देण्यात आला. यावेळी एसटी डेपो नांदेड आगार कामगार- कर्मचाऱ्यांच्यावतीने एसटी मेकॅनिक तथा महाराष्ट्र शासन पुरस्कार प्राप्त सामाजिक कार्यकर्ते मा. श्री. गुणवंत एच. मिसलवाड यांनी पुष्पहाराने श्री. मंगेश कांबळे यांचा हृदय सत्कार केला.

याप्रसंगी प्रमुख उपस्थिती म्हणून आगार व्यवस्थापक अनिकेत बल्लाळ, एसटी विभागीय कार्यशाळेचे सहाय्यक कार्यशाळा अधीक्षक मा. श्री. अशोकराव चव्हाण, वाहतुक नियंत्रक राजकुमार कांबळे, सुनील मोरे, एसटी मेकॅनिक तथा महाराष्ट्र शासन पुरस्कार प्राप्त सामाजिक कार्यकर्ते गुणवंत एच. मिसलवाड, पाळी प्रमुख अविनाश भागवत, चालक विजयकुमार आढाव, लिपीक सौ. रेखा माचीनवार, वैशाली कोकणे, सुनीता हुंबे, योगीता सुवर्णकार, वैष्णवी तेली यांची प्रमुख उपस्थिती होती. यावेळी मा. श्री. गुणवंत एच. मिसलवाड यांनी या कार्यक्रमाचे प्रास्ताविक करुन आपले विचार मांडले. ते आपल्या भाषणात म्हणाले की, मा. श्री मंगेश कांबळे यांनी एसटीच्या नांदेड विभागाच्या यांत्रिकी मेंन्टेनन्स विभागात चालक, वाहक, यांत्रिकी कामगार, कर्मचाऱ्यांना वेळोवेळी मोलाचे मार्गदर्शन करुन प्रवाशी सेवेमध्ये मोठे योगदान दिले आहे, असे प्रतिपादन त्यांनी केले.

पुढे बोलताना ते आपल्या प्रास्ताविकात म्हणाले की, श्री. मंगेश कांबळे यांनी नांदेड जिल्ह्यातील तमाम एसटी कर्मचाऱ्यांना प्रेमाची वागणूक, जिव्हाळा त्यांनी जोपासला असून कामगार कर्मचाऱ्यांनीही त्यांना त्यांच्या स्वभावामुळे भरभरुन प्रेम दिले आहे, असा दुहेरी संगम म्हणजे श्री मंगेश कांबळे हे आहेत असे ते शेवटी म्हणाले. या कार्यक्रमास आगारातील कामगार- कर्मचारी, बंधु भगिणी बहुसंख्येने उपस्थित होते.

### टि.सी.हरवली आहे.

निरूडे दत्ता गुलाब या नावाची रामचंद्र बलदवा ज्ञानेश्वर कनिष्ठ महाविद्यालय शाहू चौक, लातूर येथून जात असताना राणी अंकुलगा ता.शिरूर अनंतपाळ १२ वी पासची टि.सी.प्रवासादरम्यान हरवली आहे. जरी कोणास सापडली असेल तर त्यांनी खालील पत्त्यावर संपर्क साधावा. आणून देणाऱ्यास योग्य ते बक्षीस दिले जाईल.

* संपर्क *
**कोल्हे नगर, गणेश मंदिर, लातूर**
मो.७८४१०२४०४६
९६५७६७७१०९

# प्राचार्य डॉ.नागोराव कुंभार यांना फुले...

(पान १ वरून) आयोजन केले जाते. यंदाच्या वर्षी फुले-आंबेडकर साहित्य पुरस्कारासाठी निवड झालेल्या प्राचार्य डॉ. नागोराव कुंभार यांनी गेली ३८ वर्षे सातत्य व गुणवत्ता टिकवुन विचारशलाका या नियतकालिकाचे संपादन करीत आहेत. राजर्षी शाहू महाराज, महात्मा फुले आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या विचारधारेचा आणि स्वातंत्र्य, समता, बंधुता, न्याय, लोकशाही, समाजवाद, धर्मनिरपेक्षता आदी मूल्ये आणि तत्वांचा तसेच भारतीय संविधान यांच्या प्रचार व प्रसाराचे कार्य प्राचार्य डॉ. नागोराव कुंभार यांनी मराठवाड्यातील लातूरसारख्या शहरात राहून विचारशलाका चालवुन समाजप्रबोधनाचे मोठे कार्य अत्यंत व्रतस्थवृत्तीने केले आहे. प्राचार्य डॉ. नागोराव कुंभार यांच्या मार्गदर्शनाने ५ विद्यार्थी एम. फील. व ११ विद्यार्थ्यांनी पीएच.डी. पदवी संपादन केली आहे. त्यांनी समाजप्रबोधनाच्यादृष्टीने महात्मा गांधीजींचे सामाजिक तत्त्वज्ञान, महात्मा गांधीजींची सत्याग्रहाची संकल्पना, भ्रष्टाचार : स्वरूप व संदर्भ, डॉ. आंबेडकरांचे शैक्षणिक तत्त्वज्ञान, महाराष्ट्रातील ध्येयवादी तत्वचिंतक, सामाजिक कार्याच्या दिशा, विचारतरंग, तरुण मनाच्या वाटा आणि वळणे आदी ग्रंथाचे लेखन आणि तसेच त्यांनी चिंतन एका कुलगुरूचे, शिक्षण विचार, महाराष्ट्रातील समाजचिंतन, सर्वस्पर्शी डॉ. बाबासाहेब आंबेडकर आणि यशवंतराव चव्हाण आदी ५० ग्रंथाचे संपादन केलेले आहे. त्यांनी शासकीय आणि निमशासकीय विविध समित्यांमध्ये लोकोपयोगी कार्य केलेले आहे त्यांनी सदस्य, राज्य मागासवर्ग आयोग, अध्यक्ष, महाराष्ट्र तत्वज्ञान परिषद, सदस्य, महाराष्ट्र राज्य मराठी विश्वकोश निर्मिती मंडळ, सदस्य, महाराष्ट्र राज्य दर्शनीका संपादक मंडळ आणि पुणे येथील माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळाच्या तत्त्वज्ञान अभ्यास मंडळाचे अध्यक्ष म्हणून भरीव कार्य केलेले आहे. ते महाराष्ट्र शासनाचा डॉ. बाबासाहेब आंबेडकर दलित मित्र पुरस्कार, स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठाचा पहिला आदर्श शिक्षक पुरस्कार, आंतरराष्ट्रीय शिक्षण व व्यवस्थापन संस्था, दिल्लीचा उत्कृष्ट प्राचार्य पुरस्कार, महाराष्ट्र फाउंडेशनचा ५०,०००/- चा पुरस्कार आणि महाराष्ट्र साहित्य परिषद पुणेचा श.वा. किर्लोस्कर पुरस्कार या व इतर अनेक पुरस्कारानी सन्मानित आहेत. या पुरस्काराबद्दल सर्व स्तरातून त्यांचे मन:पूर्वक अभिनंदन केले जात आहे.

# शिक्षकांनी विद्यार्थीकेंद्रित शिक्षणाला ...

(पान १ वरून) संस्थेमध्ये शिस्त महत्त्वाची आहे. यामुळे शैक्षणिक विकासाला वाव मिळतो. राजमाता जिजामाता शैक्षणिक संकुलात शिस्त आणि विद्यार्थ्यांच्या विकासाला प्राधान्य देण्यात येते. त्यामुळे या संस्थेने लौकिक मिळवला आहे. प्राचार्य डी. एन. केंद्रे यांच्या नेतृत्त्वामुळे हे शक्य झाले आहे, असे सांगून यापुरस्काराबद्दल संस्थाचालकांचे कौतुक करून या संस्थेचा इतर संस्थांनी आदर्श घ्यावा, असेही त्यांनी सांगितले.

यावेळी मठपती म्हणाले, शिक्षणासोबतच विद्यार्थ्यांमध्ये सुसंस्कार निर्माण करावेत. विद्यार्थ्यांनी आपले ध्येय निश्चित करून यश संपादन करावे. या संस्थेत विद्यार्थ्यांच्या गुणात्मक विकासाला महत्त्व दिले जाते. म्हणून या संस्थेने शिक्षण क्षेत्रात उल्लेखनीय यश संपादन केले आहे, असे गौरवोद्गारही त्यांनी काढले. यावेळी प्राचार्य केंद्रे म्हणाले, या संकुलात तज्ज्ञ प्राध्यापक व शिक्षकांकडून विद्यार्थ्यांना गुणवत्तापूर्ण शिक्षण दिले जाते. नियमित तास, जादा तासिका घेवून विद्यार्थ्यांच्या शंकांचे निरसन केले जाते. या संकुलाने न्यायाधीश, मंत्रालयात उपसचिव, डॉक्टर, इंजिनिअर, सी.ए., शिक्षक, प्राध्यापक घडवले आहेत. त्यामुळे राजमाता जिजामाता विद्यालयास आयएसओ मानांकन प्राप्त झाले आहे.

प्रास्ताविकात मुख्याध्यापिका स्वाती केंद्रे यांनी संस्थेला मिळालेली पारितोषिके, संस्थेच्या गुणवत्तेचा वाढता आले व विविध उपक्रमांबद्दल माहिती सांगितली.

यावेळी स्वामी रामानंद तीर्थ विद्यापीठात तृतीय आलेल्या व धाराशिव जिल्हा परिषदेच्या शाळेत शिक्षक म्हणून रूजू झालेल्या या संस्थेचा माजी विद्यार्थी प्रितेश गुरमे याचे पुष्पगुच्छ देवून कौतुक करण्यात आले. सूत्रसंचालन पर्यवेक्षिका सुनीता जवळे यांनी केले तर आभार मदन धुमाळ यांनी मानले. यावेळी प्राध्यापक, शिक्षक, कर्मचारी व विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# लातूरला स्वतंत्र विद्यापीठासाठी, आम्ही लातूरकर विद्यापीठ ....

(पान १ वरून) माजी मुख्यमंत्री तथा लोकनेते विलासराव देशमुख यांच्या प्रयत्नातून २००७ मध्ये स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ नांदेड अंतर्गत पेठ येथे उपकेंद्र सुरु करण्यात आलेले आहे . आज लातूर जिल्हयात कला, वाणिज्य, विज्ञान, औषधनिर्माणशास्त्र, विधि, अभियांत्रिकी, वैद्यकीय अनुदानित ३६ महाविद्यालय, तर कायम विनाअनुदानित ८२ असे जवळपास एकूण ११८ महाविद्यालये आहेत एकूण विद्यार्थी संख्या ५५,४१० आहेत तर लातूर शहरात त्यापैकी ४० महाविद्यालये आहेत. लातूरच्या शैक्षणिक, प्रशासकीय कामाचे स्वरूप लक्षात घेता, महाविद्यालयीन प्राध्यापक, कर्मचारी, विद्यार्थी, पालकांना नांदेडला पायपीट करावी लागते आहे, शेजारच्या सोलापूर जिल्हयासाठी महाविद्यालयाची संख्या १०९ असताना विद्यार्थी, पालक व शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांच्या सोईसाठी २०१४ मध्ये स्वतंत्र विद्यापीठ शासनाने दिलेले आहे

मराठवाड्यात छत्रपती संभाजी नगर नंतर लातूर शहर, जिल्हयाचे शैक्षणिक योगदान मोठे आहे त्यामुळेच लातूर येथे शैक्षणिक गुणवत्तेवर विद्यापीठाची आग्रही मागणी गेल्या अनेक वर्षांपासून आम्ही लातूरकर विद्यापीठ निर्माण कृती समितीच्या वतीने करण्यात येते आहे. शिक्षणतज्ञ डॉ राम ताकवले व अन्य शिक्षण तज्ञांनी सुद्धा विद्यार्थी संख्या व महाविद्यालयाची आकडेवारी प्रमाणे जिल्हा निहाय विद्यापीठ स्थापन करणे काळाची गरज आहे, शैक्षणिक क्षेत्रात गुणवत्ता कार्य कुशलता वाढविण्यासाठी आवश्यक पूर्तता होणाऱ्या ठिकाणी नविन विद्यापीठ विस्तार होणे पुरक असल्याचे मते नमुद केलेली आहेत. आम्ही लातूरकर विद्यापीठ निर्माण कृती समितीच्या वतीने लोकप्रतिनिधी ते ना राज्यपाल, ना मुख्यमंत्री यांना निवेदने, धरणे, स्वाक्षरी मोहीम , पोस्ट कार्ड मोहिम, महात्मा गांधी चौक लातूर येथे सलग चार दिवस बेमुदत उपोषण आंदोलनाच्या माध्यमातुन विद्यापीठाची मागणी सातत्याने लावून धरलेली आहे . लातूरला स्वतंत्र विद्यापीठा च्या मागणीसाठी महात्मा गांधी चौक लातूर येथे शासनाचे व सभागृहाचे लक्ष वेधण्यासाठी लक्षवेधी निदर्शने आंदोलन केले असल्याची माहिती मुख्यसंयोजक अँड प्रदिपसिंह गंगणे यांनी दिली आहे

यावेळी समन्वयक बालाजीप्पा पिंपळे, सिनेटसदस्य धनराज जोशी,ताहेरभाई सौदागर, प्रा शिरीषकुमार शेरखाने, जम्मालोद्दीन मणियार, अजयसिंग राठोड,फिरोज तांबोळी, दिगबर कांबळे, महेन्द्र गायकवाड, आकाश कांबळे,लहू जाधव खरोळे, किरण कांबळे,अतिश नवगिरे, अँड परमेश्वर इंगळे, स्वामी रत्नेश्वर, यशपाल ढोरमारे, श्रीकांत गंगणे, दिनेश डोईजड, राजू बुये, शंकर काळे, विकास माने, बिपिन चौहाण, वैशाली महालींगे, राहुल पवार, मंगेश डोबाळे, अमर पाचांगे, संतोष जाधव आदीची उपस्थिती होती.

# दयानंद विज्ञान कनिष्ठ महाविद्यालयाचा ...

(पान १ वरून) परंपरा कायम राखणारी व विद्यार्थी केंद्रबिंदू मानून यशाची हमखास खात्री देत विद्यार्थ्यांचे करिअर घडवणारी संस्था असून या संस्थेच्या व महाविद्यालयाच्या माध्यमातून जेईई,नीट आणि एमएचटी-सीईटीचा लातूर शैक्षणिक पॅटर्न निर्माण केलेला आहे.विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी तज्ज्ञ व अनुभवी प्राध्यापक,विद्यार्थी समस्या निर्मूलन केंद्र,नाईट रिडींगची सोय,सुसज्ज ग्रंथालय,स्मार्टबोर्डयुक्त डिजिटल वर्गखोल्या,विद्यार्थ्यांच्या वेळोवेळी घेतल्या जाणाऱ्या सराव परीक्षा व इतर उपक्रम महाविद्यालयात सातत्याने राबविले जातात.दयानंद शिक्षण संस्था ही विद्यार्थ्यांच्या हितासाठी खंबीरपणे पाठीशी आहे. पालकांनीही विद्यार्थ्यांचा अभ्यास,करावयाच्या तासिका व त्यांची वयोमानानुसार बदलत जाणारी मानसिकता याकडे कटाक्षाने लक्ष दिले पाहिजे. विद्यार्थ्यांनीही आई-वडिलांच्या कष्टांची जाणीव ठेवत भावी आयुष्य घडविले पाहिजे.

प्रास्ताविकातून उपप्राचार्य प्रा.भाऊसाहेब सरवदे यांनी दयानंद शिक्षण संस्था व महाविद्यालय विद्यार्थ्यांचे कल्याण व त्यांचे उज्ज्वल भविष्य हेच ध्येय डोळ्यासमोर ठेवून अविरतपणे कार्यरत आहे. विद्यार्थी हे नीट,जेईई व सीईटीमध्ये निश्चितच गुणवत्तेत येतील असे आश्वासनही त्यांनी दिले तर आभार प्रा.पर्यवेक्षिका डॉ.संध्या कोल्हे यांनी मानले.सूत्रसंचालन प्रा.व्यंकट कैले यांनी उत्कृष्टरित्या केले.यावेळी नीट विभागाची माहिती समन्वयक डॉ.वैशाली पाटील यांनी,एमएचटी-सीईटी विभागाची माहिती प्रा.कविता जाधव यांनी व जेईई विभागाची माहिती प्रा.रविकुमार यांनी सविस्तरपणे करून दिली.आर्यन बोराडे,प्रतीक सूर्यवंशी,आदित्य, शिवगंगा पाटील,वैभवी जाधव व पालक प्रतिनिधी यांनी दयानंद शिक्षण संस्था व महाविद्यालयाबद्दलचे अनुभव मनोगतातून व्यक्त केले तसेच जेईई,नीट,सीईटी परीक्षेत व बोर्डात प्रथम,द्वितीय व तृतीय आलेल्या विद्यार्थ्यांना दयानंद शिक्षण संस्थेच्या वतीने अनुक्रमे १० हजार,०७ हजार व ०५ हजार रुपये देण्यात आली.या मेळाव्याप्रसंगी पीआरओ प्रा.बळवंत सूर्यवंशी,परीक्षा विभाग समन्वयक प्रा.विजयकुमार मांदळे यांच्यासह इतर प्राध्यापक,शिक्षकेत्तर कर्मचारी,विद्यार्थी आणि पालक बहुसंख्येने उपस्थित होते.

# मागील १९ वर्षापासून विवेकानंद हॉस्पिटल...

(पान १ वरून) लक्ष्मणाच्या साह्यार्थ संजीवन वनस्पतीसाठी पर्वत उचलून आणणाऱ्या हनुमंताची पवित्रता या डॉक्टर मंडळींमध्ये असते. आपली रुग्णसेवा म्हणजेच ईश्वर सेवा असे समजून रुग्णाला बरे करतात. सेवा केल्याचा आनंद दुसरा कोणता मोठा असू शकत नाही. डॉक्टरांना एक ऊर्जाच मिळते. असे डॉक्टर समजतात.

पाऊले चालती पंढरीची वाट, त्यात वैद्यकीय सेवेची भेट या ऊक्तीप्रमाणे, विवेकानंद हॉस्पिटल लातूर. हे वारकऱ्यांची सेवा ही ईश्वर सेवा समजून गेली १८ वर्ष पंढरीच्या वारीमध्ये वैद्यकीय मोफत सेवा देत. त्यात सातत्य ठेवून, आज रविवार दि.०७/०७/२०२४ रोजी १९ व्या वर्षीही औषधोपचाऱ्याच्या वाहनासह दोन डॉक्टर व दहा कर्मचारी असे १२ जणांच्या पथकासह पंढरीच्या दिशेने रवाना झाले.

या मोफत वैद्यकीय सेवेचे संस्थापक अध्यक्ष डॉक्टर अशोकराव कुकडे यांनी महाराष्ट्राला आदर्श घालून दिला आहे. त्याचे सर्वत्र कौतुक होत आहे.

पथक देवदूतांच्या माध्यमातून सलग दहा दिवस अहोरात्र वारकऱ्यांची मोफत सेवा करणार आहेत. या पथकातील भुजंग चिवडे, मधुसूदन जाधव, चालक- राजकुमार ठाकूर, सहदेव गावकरे, दगडू जाधव, बालाजी भोईबार, आदित्य पुंडकरे, संदीप वाघबीजे, आदींचे विवेकानंद हॉस्पिटलचे संस्थापक अध्यक्ष डॉ.अशोकराव कुकडे, कार्यवाह- डॉ. राधेश्याम कुलकर्णी, अध्यक्ष- अनिल अंधोरीकर, विश्वस्त डॉ. अनघा लवलेकर, डॉ. गोपीकिशनजी भराडिया, डॉ. संतोष देशपांडे, डॉ. दिलीप देशपांडे, या सर्वांचे स्वागत करून राष्ट्रीय अपराध जाँच ब्यूरो नवी दिल्ली शाखा लातूर महाराष्ट्रचे अधिकारी शिरीषकुमार शेरखाने यांनीही उपस्थित राहून आरोग्य पथकाला शुभेच्छा दिल्या.

यावेळी विवेकानंद हॉस्पिटलचे सर्व वैद्यकीय अधिकारी, परिचारिका आदिसह सर्व कर्मचारी वृंद मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# धनगर समाजाच्या आमरण उपोषणकर्त्यांची ...

(पान १ वरून) राज्य विधिमंडळाचे अधिवेशन मुंबईत सुरू असून आ. रमेशआप्पा कराड शनिवारी लातूरात येताच अहिल्यादेवी होळकर चौकात जाऊन उपोषणकर्त्याची भेट घेतली प्रकृतीची चौकशी करून धनगर समाजाची मागणी रास्त आणि योग्य असल्याने या लढ्यात मी खंबीरपणे सोबत आहे असा दिलासा दिला. उपोषणाचा नववा दिवस आहे. राज्यातील महायुती शासन धनगर समाजाच्या मागण्यांबाबत सकारात्मक विचार करीत असल्याने आपण औषध उपचार घ्यावेत अशी विनंती आ. कराड यांनी यावेळी उपोषणकर्त्यांना केली तेव्हा त्यांनी ही विनंती मान्य केली.

राज्याचे इतर मागास कल्याण मंत्री अतुलजी सावे आणि जिल्ह्याचे पालकमंत्री गिरीशजी महाजन यांच्याशी चर्चा झाली असल्याची माहिती देऊन यावेळी बोलताना आ. रमेशआप्पा कराड म्हणाले की, उपोषणकर्त्यांचे प्रतिनिधी आणि समाजबांधव यांच्या शिष्टमंडळाची मुख्यमंत्र्या समवेत चर्चा घडवून आणू. या आंदोलनाला यश मिळवून देण्याचा प्रयत्न करणार असल्याचेही त्यांनी बोलून दाखविले. धनगर समाजाच्या या आंदोलनाला पाठिंबा देणारे पत्र आ. कराड यांनी यावेळी उपोषणकर्त्यांना दिले. याप्रसंगी आ. कराड यांच्या समवेत भाजपाचे भागवत सोट, अनिल भिसे, दशरथ सरवदे, डॉ. बाबासाहेब घुले, वसंत करमुडे, सतीश आंबेकर, शरद दरेकर, संभाजी वायाळ, भैरवनाथ पिसाळ, नानासाहेब कस्पटे, श्रीमंत नागरगोजे, अशोक सावंत, विष्णू पाटील, बालासाहेब कदम, भैय्या गाडे, विलास अमनावर, बबन सोनकर, लक्ष्मण खलंग्रे, विठ्ठल कस्पटे, यांच्यासह अनेक जण होते तर उपोषणस्थळी अॅड. अनिरुद्ध येचाळे, विशाल देवकते, सचिन दाने, सुभाष लवटे प्रा लहूकांत शेवाळे, एकनाथ पाटील, वैजनाथ लवटे, अॅड. अभिजीत मदने, श्रीकृष्ण काकडे, रमेश सुरवसे, प्रा अशोक अभंगे, मुरलीधर अंनचुळे, गणेश होळे, अण्णा कोळगे यांच्यासह धनगर समाज बांधव मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# आपल्या राष्ट्राचे भवितव्य निर्भय करणे हे जागरुक ...

(पान १ वरून) सार्वत्रिक उद्योग आणि व्यवसायांची स्थिती फारशी समाधानकारक नाही. एकीकडे शिक्षणात टोकाचा असमतोल तर, दुसरीकडे प्रचंड बेरोजगारी पसरलेली आहे. आणि सर्व सेवांच्या झालेल्या निर्दयी खाजगीरणामुळे, आपल्या तरुणाईचे बेसुमार शोषण होत आहे.

अशा धोकादायक विसंगतीमुळे, आज समाजमनात सर्वत्र एक सुप्त अराजक धुमसते आहे. आणि अशी अवस्था ही लोकशाही स्वातंत्र्याला व नियोजनबद्ध विकासाला धोकादायी मारक असते. त्यामुळे विचारशील अशा प्रत्येक जागरूक नागरिकांनी, आपल्या देशाला आश्वासक भविष्य देऊन, आपल्या युवक-युवतीना उद्यमशील स्वावलंबी बनवून, आपला मानवी समाज समृद्ध करावा असे आवाहनही रायवाडीकर यांनी केले. तर पांडुरंग देडे हे आपल्या मनोगतामध्ये म्हणाले की, आपण निसर्ग आणि पर्यावरणाचे संरक्षण केले तरच, आपल्या भावी पिढ्या पृथ्वीवर जगू शकतील. अन्यत: निसर्ग हा आपल्या हव्यासीवृत्तीचा अखेरचा कायम लेखा-जोखा मांडेल. त्यास पशु-पक्षी नव्हे तर, हा चालता-बोलता बुद्धीमान माणूसच, सर्वस्वी जबाबदार असणार आहे. म्हणून नागरिकांनी समर्पित पणे पर्यावरण राखून, निरोगी सृष्टी आणि सजीव संपन्न करावा. अध्यक्षीय समारोपात श्री पंडितराव बंडे म्हणाले की, आपण रोप आणि माती शहराबाहेरून आणली आहे. सदर सार्वजनिक रिक्त जागेवर आपल्या परिवाराच्यावतीने, अधिक ऑक्सिजन देणा-या स्वदेशी विविध उपयुक्त अशा, सुमारे ५० ते १०० वृक्ष रोपांची यंत्राच्या सहाय्याने लागवड करण्यात येत आहे.

प्रारंभी सुमेधा बंडे महिला परिवाराच्यावतीने सामाजिक कार्यकर्ते रामकुमार रायवाडीकर व राष्ट्र सेवादलाचे जिल्हाध्यक्ष पांडुरंग देडे यांचा, रोपवृक्ष देऊन सत्कार करण्यात आला. त्यानंतर बालाजीनगर रेड्डी कॉलनी येथील एका मंदिरांच्या, सुमारे सात हजार फुटांच्या खुल्या प्लॉटमध्ये प्रमुख पाहुण्यासह, सर्व उपस्थित महिला व अन्य नागरिकांच्या हस्ते वड, पिंपळ, लिंब, चाफा, पारिजात आदी वृक्ष रोपांची लागवड करण्यात आली.

या कार्यक्रमाचे प्रास्ताविक श्री अतिष नवगिरे यांनी केले. तर सूत्रसंचालन श्री आत्माराम गिरीमहाराज यांनी केले. आणि श्री अनिकेत बंडे यांनी आभार पदर्शन केले. या प्रसंगी सौ. सुमेधाताई बंडे, गणपतराव तेलंगे, श्री माणिकराव सावंत, साथी संजय व्यवहारे, अनिल कुलकर्णी, सौ. संगीता बदनाळे, सौ. रेखा पेठे, गंगुबाई सिनगीरे, संगीता कुलकर्णी, गोविंद सिनगीरे, मिनाक्षी पडिले, विजयमाला बोरडे, श्री तानाजी वल्लमपल्ले, श्री मिरकले दादा, विपीन बोरडे, गोपाळतात्या चिकाटे, कबीर रायवाडीकर, नितीन हटकर, यश पारशी, सुधीर वंजारे, सुशांत पारशी, नीतिन पडिले इत्यादी उपस्थित होते.

# आगामी विधानसभा निवडणुकीमध्ये दैनिकाप्रमाणे साप्ताहिकांनाही जाहिरातीचे वितरण करण्यात यावे

## व्हाईस ऑफ मिडीया साप्ताहिक विंगचे जिल्हाधिकाऱ्यांना निवेदन

लातूर : ६ मार्च, ७ मार्च व ८ मार्च २०२४ रोजी संपूर्ण महाराष्ट्रातील जिल्हा दैनिक व वृत्तपत्रांना विकसित भारत व विकसित महाराष्ट्राच्या दर्शनी जाहिराती वितरीत करण्यात आल्या होत्या. विकासात्मक धोरणाच्या जाहिराती देताना सर्व वृत्तपत्रांना समान जाहिराती वाटप व्हायला पाहिजे.



याबरोबरच शासन मान्य यादीवर असलेल्या आणि नसलेल्या साप्ताहिकांना सुध्दा जाहिरात मिळायला हव्यात असे धोरण शासनाने राबवावे, जेणेकरून लघु वृत्तपत्रावर अन्याय होणार नाही. तरीही मार्च २०२४ मध्ये दिलेल्या जाहिरातीमध्ये महाराष्ट्रातील साप्ताहिकांना डावलण्यात आले. हे वास्तव असले तरी आगामी विधानसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमिवर तरी दैनिक वृत्तपत्रांबरोबर साप्ताहिकांना जाहिराती देण्यात याव्यात या मागणीसह इतर मागण्याचे निवेदन व्हाईस ऑफ मिडीया साप्ताहिक विंगच्यावतीने जिल्हाधिकार्यांना देऊन जिल्हाधिकारी कार्यालयासमोर निदर्शने करण्यात आली.



या निवेदनामध्ये साप्ताहिक वृत्तपत्रांची द्विवार्षिक पडताळणी दर पाच वर्षांनी करावी, साप्ताहिक वृत्रपत्रांची जाहिरात दरवाढ करावी, अधिस्विकृतीधारक पत्रकारांना एस.टी.महामंडळात परिवारासह सवलती देण्यात याव्यात, रेल्वे प्रवासासाठी अधिस्विकृतीधारकांना १०० टक्के सवलत सुरू करावी, पत्रकार व पत्रकारांच्या कुटुंबियासाठी आरोग्य विमा व मोफत उपचाराची सवलत देण्यात यावी, आरएनआयकडून नवीन नियमावलीनुसार लावण्यात आलेल्या जाचक अटी रद्द कराव्यात, जिल्ह्यातील सर्वसाधारण पत्रकारांना सरंक्षण कायद्याअंतर्गत सरंक्षण देण्यात यावे व सदरील कायद्याची १०० टक्के अंमलबजावणी करण्यात यावी, सर्वसाधारण पत्रकारांच्या पाल्यांना प्राथमिक व उच्च शिक्षण मोफत करण्यात यावे, भ्रष्टाचार, खून, फसवणूक अशा गंभीर घटनेची माहिती पत्रकारांना मिळण्यासाठी जिल्हाधिकारी कार्यालयामध्ये स्वतंत्र कक्ष निर्माण करण्यात यावा या मागणीसह इतर मागण्यासाठी जिल्हाधिकारी कार्यालयासमोर निदर्शने करून जिल्हाधिकार्यांना निवेदन देण्यात आले.

यावेळी या निवेदनाला व्हाईस ऑफ मिडीयाचे बालाजी फड, जिल्हाध्यक्ष संगम कोटलवार, शिरीषकुमार शेरखाने, जिल्हा कार्याध्यक्ष शहाजी पवार, व्हाईस ऑफ मिडीया साप्ताहिक विंगचे मराठवाडा सचिव वामन पाठक, जिल्हाध्यक्ष विष्णू अष्टेकर, व्हाईस ऑफ मिडीया मराठवाडा कार्यवाहक बाळासाहेब जाधव,निशांत भद्रेश्वर, डिजिटल विंगचे सितम सोनवणे, अभय मिरजकर, दिलीप मुनाळे, गणपती राठोड, काकासाहेब घुटे, सुधीर गंगणे, राघवेंद्र देबडवार, प्रभाकर शिरूरे, खंडेराव देडे, पी.आर.पाटील, आर.एस.रोडगे, म.वि.चलमले, मनिष हजारे, राजप्रसाद काबरा, ईस्माईल शेख, आनंद दणके, संतोष सोनवणे, अशोक कुलकर्णी, झटींगअण्णा म्हेत्रे, विशाल हालकीकर, शिवाजी पाठेकर, विनोद गुडे, सिध्दार्थ चव्हाण, ईश्वर बद्दर, वाल्मिक केंद्रे, सुधाकर फुले, गोपाळ चिताडे, शरद राठोड, मधुकर गालफाडे, साईनाथ घोणे, नामदेव शिंदे, शिवाजी यमते, निजाम शेख, बाळय्या स्वामी, सोमनाथ स्वामी, दिनेश गिरी, वी.तगलपल्लेवार यांच्यासह व्हाईस ऑफ मिडीयाचे पदाधिकारी व कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# मराठवाड्यातील पहिले कॉक्लीअर इम्प्लान्ट लातूर येथील गोरे हॉस्पिटलमध्ये

**भारतात जन्माला येणाऱ्या कर्णबधिर मुलांपैकी ९० टक्के मुलंही जन्मभर कर्णबधीरच राहतात. या मुलांचे शिक्षण व भविष्यातील व्यावसायिक कौशल्य या सर्वांवरच खूप परिणाम होतो. जागतिक आरोग्य संघटनेच्या अंदाजानुसार भारतात ६ कोटी ३० लाख लोक कर्णदोषाने बाधित आहेत. थोडक्यात प्रत्येक १००० लोकसंख्येमागे ४ बालकं जन्मजात कर्णबधिर जन्माला येत आहेत. २० वर्षापर्यंत भारतात या लोकांसाठी आपल्याकडे फारसे उपाय वैद्यकशास्त्रात नव्हते. पण आता कॉक्लीअर इम्प्लान्ट सारख्या शस्त्रक्रियेमुळे हे चित्र बदलताना दिसत आहे. १ जुलै डॉक्टर्स डे च्या निमित्ताने या विषयावर सर्वसामान्यांची जनजागृती करण्याच्या उद्देशाने लिहलेला लेख.**




एखादी व्यक्ती (मुल) ऐकते कसे ? हवेतील आवाज किंवा ध्वनीलहरी जेंव्हा कानावाटे मधल्या कॉक्लीआवर पडतात तेंव्हा तेथील ऐकण्याची नस या लहरींना इलेक्ट्रिक सिग्नल्स मध्ये रुपांतरित करते व मेंदूतील ऐकण्याच्या केंद्रापर्यंत पोहचवते. तेथून मेंदूतील बोलण्याचे (वाचा) केंद्र उत्तेजीत होते व माणसाला ऐकलेल्या ध्वनी लहरींना शब्दामध्ये समजणे सोपे जाते. याचाच अर्थ एखादया व्यक्तीला, मुलाला बोलता येण्यासाठी ऐकण्याची क्षमता जन्मतः चांगली कार्यरत असणे अत्यावश्यक आहे.

पण एखादी व्यक्ती जन्मजात मूकबधिर असल्याची कारणे काय ? गरोदरपणात आईला रुबेला सारखा संसर्ग होणे किंवा आईकडून काही ऑटोटॉक्सीक औषधे घेतली जाणे, बाळ जन्मताना त्याचे वजन खूप कमी असणे, जन्मजात कावीळ लवकर बरी न होणे. जन्मतः बाळाला काचेच्या पेटीत ठेवण्याची वेळ आल्यास या रुग्णांमध्ये १० ते २० टक्क्यांनी कर्णबधीर असण्याची शक्यता वाढते. पहिल्या ३ वर्षांमध्ये मेंदूज्वर झाल्यास कर्णबधीरपणा येऊ शकतो. या शिवाय साधारणतः ५० टक्के बालकांमध्ये आनुवंशिकतेमुळे किंवा जन्मजात कर्णबधिरपणा असू शकतो. पालकांना कसे कळणार की आपले मुल कर्णबधिर आहे. खरं तर पालकांमध्ये विशेषतः आईमध्ये ही जागृती हवी की हा आजार कुठल्याही मुलाला होऊ शकतो. पहिल्या ३ महिन्यांमध्ये बाळ मोठ्या आवाजांमुळे जसे कि भांडे पडले कपाट उघडले कि दचकते. ३ ते ६ महिन्यांचे बाळ आईचा आवाज ओळखून त्या दिशेने



**डॉ.आनंद दि.गोरे**
संपर्क–९४२२०१४५८०
एमबीएस, एमएस,
डिओआरएल (मुंबई)

डोळे फिरवणे, मान फिरवणे असा प्रतिसाद देते. ६ महिने ते १ वर्षांचे मुल आवाजाने आईच्या बोलण्याला प्रतिसाद द्यायला लागते. १ वर्षानंतर ते मुल बाबा मामा असे शब्द उच्चारायला लागते. विचारल्यास कान, नाक व डोळे असे अवयव दाखवायला शिकते. बाळाच्या वाढीमध्ये हे मैलाचे दगड फार मोलाचे आहेत. त्यापैकी कश्यातही ते मुल बसत नसेल तर पालकांनी वेळीच कान, नाक व घसा तज्ञांकडे सल्ला घ्यायला हवा.

बाळाच्या श्रवणदोषाची खात्री कशी करायची? बाळाला लस द्यायला गेल्यावर तुम्ही तुमच्या लहान मुलांच्या डॉक्टरांशी चर्चा करून कान, नाक व घसा तज्ञांकडे जाऊ शकता. अत्यंत सोप्या, न त्रास होणाऱ्या व कमी खर्चीक चाचण्यामुळे खात्रीशीर निदान होऊ शकते. पण मग यावर उपाय काय?

कॉक्लीअर इम्प्लान्ट नावाचे एकयंत्र कानाच्या आत शस्त्रक्रिया करून बसवले जाते. कानाच्या बाहेरून एक स्पीच प्रोसेसर बसवला जातो. ही शस्त्रक्रिया पूर्णपणे सुरक्षित असून पूर्णपणे कर्णबधिर असलेल्यांच्या आयुष्यात एक आशेचा किरण आहे. जन्मतः कर्णबधिर मुल किंवा मोठेपणी आलेल्या कर्णबधिरपणा मध्येही ही शस्त्रक्रिया करता येते. या शस्त्रक्रियेनंतर स्पीच थेरपी घेणे अत्यावश्यक आहे ही शस्त्रक्रिया कधीही करु शकतो? बाळाचे वय ३ ते ८ वर्षे होण्याच्या आतही शस्त्रक्रिया झाल्यास ते बाळ इतर नॉर्मल बालकांसारखे ऐकू व बोलू शकते. मात्र ४ वर्षांनंतर ही शस्त्रक्रिया झाल्यास बाळाचे मेंदूतील वाचा केंद्र १०० टक्के विकसीत होईलच याची शाश्वती राहत नाही. बाळ इतके लहान असताना शस्त्रक्रिया करणे गरजेचेच आहे? हो, कारण मेंदूतील वाचा केंद्राला ऐकू आल्याशिवाय चालनाच मिळत नाही. त्याला ऐकूच नाही आले तर ते केंद्र काम करत नाही व आकुंचन पावते. मग इंम्प्लान्ट उशिरा झाल्यास हया वाचा केंद्राकडून प्रतिसाद कमी मिळतो व बोलण्याची क्षमता १०० टक्के विकसित होत नाही.

कॉक्लीअर इम्प्लान्ट नंतर लागणारी स्पीच थेरपी म्हणजे का? कॉक्लीअर इम्प्लांट हे यंत्र आवाजाला मेंदू पर्यंत पोहचवते. पण या आवाजाला शब्दाचे व भाषेचे स्वरूप मिळणे गरजेचे आहे. त्यासाठीच स्पीच थेरपी, गरजेची आहे. साधारणतः दिड ते दोन वर्ष ही स्पीच थेरपी स्पीच थेरपीस्ट मार्फत घ्यावी लागते. परदेशात १ महिन्याच्या आत बाळाची कर्णदोष तपासणी व गरज असल्यास १ वर्षांच्या आत शस्त्रक्रिया करण्यासाठी कायदा आहे. भारत सरकार, खाजगी संस्था व अनेक जण भारतातही यासाठी मदत करतात. अधिक माहितीसाठी संपर्क ९४२२०१४५८०.

# महाळंग्रा येथील फार्मसी कॉलेजचा ९१ टक्के निकाल

चाकूर : चाकूर तालुक्यातील महाळंग्रा येथील दिनेश बेंबडे फार्मसी कॉलेजच्या विद्यार्थ्यांनी महाराष्ट्र राज्य तंत्रशिक्षण मंडळाच्यावतीने घेण्यात आलेल्या डी. फार्मसी प्रथम व द्वितीय वर्षाच्या परिक्षेत उत्तुंग भरारी घेत यश संपादन केले आहे. फार्मसीचा निकाल ९१ टक्के लागला आहे.



दिनेश बेंबडे कॉलेजचे डी. फार्मसीच्या प्रथम वर्षाच्या परीक्षेत प्रथम सुचिता शिवाजी गायकवाड, द्वितीय कोमल बापूराव चिटबोने, तृतीय मेघराज सतीश भुसनर, चतुर्थ साक्षी राजेंद्र देवकते, पाचवा ओमकार दत्तात्रय चव्हाण आले आहेत. डी. फार्मसी द्वितीय वर्षामध्ये प्रथम ओमकार प्रदीप घोरपडे, द्वितीय अंजली राहूल महालिंगे, तृतीय पल्लवी विजय गुर्ले, चतुर्थ, भाग्यश्री बंडाप्पा स्वामी तर शुभांगी राजेश्वर नावंडे हिने पाचवा क्रमांक मिळवला आहे.

सर्व यशस्वी विद्यार्थ्यांचे राधेय चॅरिटेबल ट्रस्टचे अध्यक्ष दिनेश बेंबडे, सचिव सौ. प्रणिता बेंबडे, कोषाध्यक्ष विवेक बेंबडे, संचालक स्नेहा बेंबडे, डीबीएमबीए कॉलेजचे प्राचार्य डॉ. श्रीकांत ढगे, डीबी फार्मसी कॉलेजचे प्राचार्य डॉ. जयदीप यादव, डी.बी. पब्लिक स्कूलच्या प्राचार्य चामे मॅडम, प्रशासकीय अधिकारी श्रीहरी वेदपाठक, शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी आदींनी अभिनंदन केले आहे.

# श्री.छत्रपती शिवाजी विद्यालयातील सुहास माकणीकर निवृत्त



लातूर : मळवटी (ता. लातूर) येथील श्री छत्रपती शिवाजी विद्यालयातील विज्ञान विषयाचे शिक्षक सुहास तुकाराम माकणीकर ३० वर्षांच्या सेवेनंतर ३० जून रोजी सेवानिवृत्त झाले. विद्यालयाच्या वतीने त्यांचा सत्कार करून निरोप देण्यात आला.

अध्यक्षस्थानी मुख्याध्यापक युवराज शिंदे होते. प्रमुख पाहुणे म्हणून प्राचार्य गोविंद शिंदे, प्रा. धनंजय चव्हाण, उमाकांत धोंडजी, मधुकर गरड उपस्थित होते. मुख्याध्यापक युवराज शिंदे, प्राचार्य गोविंद शिंदे यांच्या हस्ते माकणीकर यांचा सपत्नीक सत्कार करण्यात आला. यावेळी मुख्याध्यापक शिंदे, प्राचार्य शिंदे यांची भाषणे झाली. कार्यक्रमास श्रीकृष्ण पवार, वैभवी पवार, विलास गिरी, मंजुषा शिंदे, चंद्रकांत चोपले, बिटाजी भोसले, सुनील आगलावे, रंगनाथ माळी यांच्यासह माकणीकरांचे नातेवाईक, विद्यार्थी उपस्थित होते. प्रास्ताविक जाकरअली सय्यद यांनी केले. सूत्रसंचलन मंजुषा शिंदे तर आभार श्रीकृष्ण पवार यांनी मानले.

# पत्रकार दत्तात्रय जी परळकर यांना पत्रकाररत्न पुरस्कार जाहीर

लातूर(प्रतिनिधी): कै त्र्यंबकआप्पा माळेवाडे प्रतिष्ठान उदगीर यांच्या वतीने देण्यात येणारा पत्रकार रत्न पुरस्कार समृध्द व्यापारचे संपादक तथा लातूर जिल्हा साप्ताहिक पत्रकार संघाचे संस्थापक सचिव दत्तात्रय जी परळकर यांना जाहीर झाला असून या संबंधीचे निवडपत्र प्रतिष्ठानचे अध्यक्ष गुरुबसप्पा माळेवाडे व उपाध्यक्ष संजय राजूळे यांच्या हस्ते नुकतेच देण्यात आले.



पत्रकारितेच्या क्षेत्रातील कार्याचा गौरव म्हणून पत्रकार रत्न पुरस्कार देऊन गौरवण्यात येणार असल्याचे अध्यक्षांनी कळविले आहे. सदरील पुरस्कार ललित भवन, नळेगाव रोड, उदगीर या ठिकाणी ९ जुलै रोजी मान्यवरांच्या हस्ते प्रदान करण्यात येणार आहे. या कार्यक्रमास हावगीस्वामी मठाचे शंभूलिंग शिवाचार्य महाराज यांचे सानिध्य लाभणार आहे. कॅबिनेट मंत्री संजय बनसोडे हे उद्घाटक म्हणून उपस्थित राहणार आहेत, आणि या कार्यक्रमाचे अध्यक्ष म्हणून नूतन खासदार डॉ शिवाजी काळगे हे असणार असल्याचे प्रतिष्ठानच्या अध्यक्षांनी कळविले आहे. या निवडबद्दल लातूर जिल्हा पत्रकार संघाचे संस्थापक अध्यक्ष रविकिरण सुर्यवंशी, जिल्हाध्यक्ष संजय राजूळे, कार्याध्यक्ष गंगाधर गाडगीळ डीगोळे, शहराध्यक्ष अमोल घायाळ, पत्रकार वामन अंकुश, राजेंद्र गुडापे, विष्णू आष्टीकर, किशोर जाधव, मोहम्मद रफी, राम रोडगे, राघवेंद्र देबडवार, दत्ता माळी, ड उमर शेख, रामचंद्र देशमुख, दीपक इंगळे आदी पत्रकार बांधवांकडून कौतुक होत आहे.

# पांडुरंग देडे यांचा सेवानिवृत्ती निमित्त सत्कार

लातूर : जोडजवळा येथील समता माध्यमिक विद्यालयातील वरिष्ठ लिपिक पांडुरंग देडे हे रविवार,दि.३० जून २०२४ रोजी नियम वयोमानाप्रमाणे सुमारे ३२ वर्षांच्या सेवेतून निवृत्त झाल्याबद्दल लातूरच्या यशवंतराव चव्हाण विद्यानिकेतन विद्यालयात त्यांचा पत्नी प्रेमा ,मुलगा ऋषिकेश देडेंसह भरपेहराव,पुष्पहार देवून सत्कार करण्यात आला.



शाळेचे मुख्याध्यापक धर्मराज शिंदे यांच्या अध्यक्षतेखाली दि.३ जून रोजी किसान शिक्षण प्रसारक मंडळाचे प्रमुख आ.विक्रम काळे यांचा वाढदिवस आणि पांडुरंग देडे यांच्या वाढदिवसाचे औचित्य साधून यावेळी शाळेतील होतकरु व गरीब विद्यार्थ्यांना कपडे आणि खाऊंचे देडे दाम्पत्यांच्या हस्ते वाटप करण्यात आले.

यावेळी प्रमुख पाहुणे म्हणून प्राथमिकच्या मुख्याध्यापिका पुष्पा जाधव,सहशिक्षक सुधाकर होळंबे यांनी पांडुरंग देडे यांच्या सेवा कार्याच्या गौरव करुन उर्वरित आयुष्याच्या शुभेच्छा दिल्या. अध्यक्षीय समारोपात मुख्याध्यापक शिंदे म्हणाले की,पांडुरंग देडे यांनी आपल्या शाळेत सुमारे ३० वर्षे लिपिक म्हणून अतिशय सचोटीने सेवा करुन संस्थेला मदत केली.त्यांनी सेवेशिवाय बाहेर शिक्षकेतर संघटना,सामाजिक, सांस्कृतिक व अन्य क्षेत्रातही उल्लेखनीय कार्य केले,त्यांचा आम्हाला अभिमान आहे.त्यांना निरोगी आरोग्य लाभो अशा शुभेच्छाही दिल्या.प्रेमा देडे यांनी आपण घर,मुले सांभाळले पण देडे सरांनी बाहेरच्या जगात मोठे कार्य केले,ते इतरांसाठी आदर्श आहे, असे मनोगत व्यक्त केले.पांडुरंग देडे यांनीही शाळेने केलेल्या सत्काराबद्दल आणि स्मृतीशेष वसंत काळेय यांनी नोकरी दिल्याबद्दल कृतज्ञता व्यक्त केली.सदरील कार्यक्रमाचे प्रास्ताविक इंद्रजित तुरुप यांनी केले.

सूत्रसंचालन सुधाकर होळंबे यांनी केले. सुरेखा कांबळे यांनी आभार प्रदर्शन केले. या कार्यक्रमासाठी गणेश माने,संगीता भालेकर,अंकिता भालेकर,शिक्षकेतर कर्मचारी चांगदेव कोळी,हरिभाऊ पाडे, लिंबराज गायकवाड आदिंनी परिश्रम घेतले.कार्यक्रमाला विद्यार्थी उपस्थित होते.

# महात्मा बसवेश्वर कनिष्ठ महाविद्यालयातील अकरावी नवोदित विद्यार्थी आणि पालकांचे उत्साहात स्वागत

लातूर : महात्मा बसवेश्वर कनिष्ठ महाविद्यालय, लातूर येथे अकरावी कला, वाणिज्य आणि विज्ञान शाखेतील विद्यार्थ्यांचा तासिका प्रारंभ दिन उत्साहात साजरा करण्यात आला. महात्मा बसवेश्वर कनिष्ठ महाविद्यालयातील अकरावी कला, वाणिज्य आणि विज्ञान शाखेतील विद्यार्थ्यांचे आणि त्यांच्या पालकांचा महात्मा बसवेश्वर महाविद्यालयाचे प्रभारी प्राचार्य डॉ. संजय गवई यांच्या हस्ते पुष्पहार तर विद्यार्थ्यांचा पुष्पगुच्छ आणि पेढे देऊन सत्कार करण्यात आला.




यावेळी उपप्राचार्य प्रा. संजय पवार, पर्यवेक्षक प्रा. शिवशरण हावळे, बोर्ड समन्वयक डॉ. गुणवंत बिरादार, नीट/जेईई/सीईटी समन्वयक प्रा. वनिता पाटील, समन्वयक प्रा. गिराम कल्पना, प्रा. स्वामी विश्वनाथ, प्रा. सोनोने रविंद्र. डॉ. घनश्याम ताडेवार, प्रा. रवींद्र सुरवसे, डॉ. अश्विनी रोडे, प्रा. वैशाली जयशेट्टे, प्रा. दीपक बजाज, प्रा. शैलेश कानडे, प्रा. नागेश सुगरे, प्रा. परमेश्वर पाटील, प्रा. कामाजी पवार, प्रा. महादेवी पटणे प्रा. शुभांगी खुब्बा, प्रा. मीनाक्षी नीला, प्रा. सरस्वती बोरगावकर, प्रा. शितल झुंजे, कार्यालयीन प्रमुख नामदेव आणि पालक यांची उपस्थिती होती.

यावेळी विद्यार्थ्यांना प्रभारी प्राचार्य डॉ. संजय गवई, उपप्राचार्य प्रा. संजय पवार आणि पर्यवेक्षक प्रा. शिवशरण हावळे आणि सर्व शिक्षकांनी विद्यार्थ्यांना शैक्षणिक वर्ष २०२४–२५ साठी हार्दिक शुभेच्छा दिल्या. यावेळी कला, वाणिज्य आणि विज्ञान शाखेतील विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

या कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी राजाभाऊ बोडके, शुभम बिरादार, जगन्नाथ येचेवाड, संतोष राठोड, अनिता धनवडे, इम्तियाज शेख, अशोक शिंदे यांनी परिश्रम घेतले.

# विद्यार्थ्यांची गैरसोय टाळण्यासाठी शाळा, महाविद्यालये ९ जुलै रोजी बंद ठेवा, रविवारी सुट्टी भरुन काढा–अखंड मराठा समाज

लातूर – ९ जुलै रोजी संघर्ष योध्दा श्री मनोज जरांगे पाटील यांची मराठा आरक्षणासाठी लातूर येथे जनजागृती आणि शांतता रॅली आयोजित करण्यात आली आहे.ही रॅली राजर्षी शाहू महाराज चौक ते छत्रपती शिवाजी महाराज चौक म्हणजेच लातूर शहरातील मुख्य रस्त्याने जाणार आहे.या कार्यक्रमासाठी जिल्ह्यातील लाखो बांधव वाहनांनी येणार आहेत.वाहनांच्या पार्किंगची व्यवस्था शहरात विविध ठिकाणी केली आहे.



लातूर शहरातील विविध शाळा महाविद्यालयातील विद्यार्थी यांच्यासाठी प्रवासी वाहतूक आहे, परंतु ९ जुलै रोजी हजारोंच्या संख्येने लातूर शहरात विविध मार्गांनी मराठा बंधु भगिनी येणार आहेत. शहरातील प्रमुख मार्गावर वाहतुक कोंडी होण्याची दाट शक्यता आहे,म्हणून मंगळवारी शाळा महाविद्यालये बंद ठेऊन विद्यार्थ्यांची गैरसोय टाळावी.तसेच त्यांचे शैक्षणिक नुकसान होऊ नये म्हणून रविवारी शाळा महाविद्यालयांनी सुट्टी भरून काढावी आणि अखंड मराठा समाज तर्फे आयोजित जनजागृती आणि शांतता रॅलीस सहकार्य करावे. लातूर शहरातील सर्व शैक्षणिक संस्थाचालक, प्राचार्य, मुख्याध्यापक, शिक्षक, विद्यार्थी प्रवासी वाहतूकदार, खासगी शिकवणी वर्ग चालक आणि लातूरच्या सुजाण नागरिकांनी मराठा क्रांती मोर्चास अमोल सहकार्य केलेले आहे तरी मंगळवारी सर्व शाळा बंद ठेवावीत असे नम्र आवाहन संयोजकांनी केले आहे.

# धनगर एस टी आरक्षण मागणीस मराठा क्रांती मोर्चाचा पाठिंबा




लातूर : २८ जुन पासून सकल धनगर समाज, लातूर जिल्ह्याच्या वतीने अनिल गोयेकर आणि चंद्रकांत हजारे धनगर एस टी आरक्षण अमंलबजावणी शासनाने करावी म्हणून आमरण उपोषणाला बसले आहेत.शासन उपोषणाची गंभीर दखल घेत नाही म्हणून समाज सनदशीर मार्गाने आंदोलन करत आहे.

गेली अनेक वर्षांपासून धनगर समाजाची न्याय मागणी केंद्र व राज्य शासनाने मंजूर करावी व धनगर समाजास एस टी आरक्षण द्यावे,या मागणीस मराठा क्रांती मोर्चा लातूर च्यावतीने पाठिंबा देण्यात आला आहे.

शासनाने बदलते संदर्भ , सामाजिक मागासलेपणा लक्षात घेऊन वंचित समाज आणि वर्गासाठी आरक्षण दिले पाहिजे केवळ बघ्याची भूमिका घेऊन विनाकारण जातीय सामाजिक तेढ निर्माण होणार नाही याची खबरदारी घेतली पाहिजे अशी अपेक्षा मराठा क्रांती मोर्चाने व्यक्त केली असून धनगर बांधवांच्या उपोषणस्थळी भेट देऊन पाठींबा दिला आहे.यावेळी अँड उदय गवारे,विक्रम माकणीकर, वैजनाथ जाधव, विकास कदम, नेहरू देशमुख, निखिल मोरे,अमीत पाटील, श्रीकृष्ण पाडे, सचिन साळुंके,बाळासाहेब जाधव, बालाजी जाधव, प्रवीण खाडप, रामदास काळे, अविनाश मोरे, दत्ता टेकाळे,शाम चव्हाण, विवेक जगताप,सिधाजी जगताप आदी उपस्थित होते.

# नवीन शैक्षणिक धोरणावर कॉक्सिटमध्ये परिसंवाद



लातूर : नव्यानेच लागू करण्यात आलेल्या नवीन शैक्षणिक धोरण २०२० वर येथील कॉक्सिट महाविद्यालयात प्राध्यापकांच्या परिसंवादाचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी महाविद्यालयातील विविध विषयांच्या तज्ज्ञ प्राध्यापकांनी संगणक शास्त्रातील विविध अभ्यासक्रमासंबंधीचे नवीन शैक्षणिक धोरणाविषयीचे ज्ञान तसेच अभ्यासक्रमाचे स्वरूप इतरांसमोर कथन केले.

प्राध्यापकांमध्ये नवीन शैक्षणिक धोरणाविषयी जनजागृती व्हावी, त्यांनी या धोरणानुसार आपापल्या विषयात पारंगत बनावे, यासाठी नांदेडच्या स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. मनोहर चासकर यांच्या सूचनेवरून येथील कॉक्सिट महाविद्यालयात प्राध्यापकांच्या परिसंवादाचे आयोजन करण्यात आले होते. अध्यक्षस्थानी रॉयल एज्युकेशन सोसायटीचे संस्थापक अध्यक्ष डॉ. एम. आर. पाटील होते. यावेळी प्रमुख पाहुणे म्हणून कॉक्सिटचे प्राचार्य डॉ. एन. एस. झुल्पे, उपप्राचार्य डॉ. डी. आर. सोमवंशी, डॉ. व्ही. व्ही. भोसले, ट्रेनिंग व प्लेसमेंट प्रमुख प्रा. कैलास जाधव, डॉ. डी. एच. महामुनी, प्रा. सुषमा मुंडे, प्रा. नितीन वाघमारे यांची उपस्थिती होती.

यावेळी डॉ. एम. आर. पाटील म्हणाले, नवीन शैक्षणिक धोरण देशभर लागू करण्यात आले आहे. त्या धोरणाचा बारकाईने अभ्यास करून प्रत्येक प्राध्यापक आपापल्या विषयात पारंगत असावा, यासाठी प्रत्येकाने मनापासून प्रयत्न करावेत, प्राध्यापकांनी आपल्या सखोल ज्ञानाचा लाभ विद्यार्थ्यांना देऊन त्यांना गुणवत्तापूर्ण बनवावे, असे आवाहन डॉ. पाटील यांनी यावेळी केले.

यावेळी महाविद्यालयातील विविध विभागांतील १०० पेक्षा अधिक प्राध्यापकांनी नवीन शैक्षणिक धोरणाविषयी आपापल्या अभ्यासक्रमातील आणि विषयातील बारकावे उपस्थितांना सांगितले. कॉक्सिटमध्ये यापूर्वीही अशा परिसंवादांचे आयोजन करून प्राध्यापकांमध्ये नवीन शैक्षणिक धोरण राबविण्याविषयी जनजागृती करण्यात आली आहे.

रॉयल एज्युकेशन सोसायटी, लातूर द्वारा संचलित
संगणकशास्त्र व माहितीतंत्रज्ञान महाविद्यालय (कॉक्सिट)
COCSIT
कॉक्सिट कॅम्पस, अंबाजोगाई रोड, लातूर
कांही रिक्त जागांसाठी प्रवेश सूचना


अ.क्र.१ ते ४ अभ्यासक्रमांना कोणत्याही शाखेचा १२ वी उत्तीर्ण विद्यार्थी प्रवेश घेऊ शकतो.

| अभ्यासक्रमाचे नाव | प्रवेशासाठी पात्रता |
|---|---|
| 1. B.Sc. Data Science | Any 12th Pass (Arts/Com./Sci./Voc.) |
| 2. B.Sc. Software Development | |
| 3. B.Sc. Network Technology | |
| 4. B.Voc. Prog. Skills for Soft. Dev. | |
| 5. B.Sc. Biotechnology | 12th Science |
| 6. B.Sc. Computer Science | Admissions Closed |
| 7. B.Sc. Software Engineering | |
| 8. B.Sc. Information Technology | |
| 9. B.Sc. Computer Management | |

अ.क्र.१ ते ४ अभ्यासक्रमांना कोणत्याही शाखेचा पदवी उत्तीर्ण विद्यार्थी प्रवेश घेऊ शकतो.

| अभ्यासक्रमाचे नाव | प्रवेशासाठी पात्रता |
|---|---|
| 1. M.Sc. (Data Science) | Graduate of Arts, Com., Sci. OR Graduate of any Faculty |
| 2. M.Sc. (Computer Application) | |
| 3. M.Sc. (Computer Management) | |
| 4. M.Sc. (Sys. Admin & Networking) | |
| 5. M.Sc. (Computer Science) | B.Sc. General with Computer Subject or Any Computer Graduate |
| 6. M.Sc. (Software Engineering) | |
| 7. M.Sc. (Biotechnology) | B.Sc. |

प्रवेशाचा अंतिम दिनांक : १३-०७-२०२४
मुलींसाठी हॉस्टेल सुविधा उपलब्ध
BCA, BBA व MCA अभ्यासक्रमाचे प्रवेश शासकीय CET च्या प्रवेश प्रक्रियेद्वारे केले जातील.



लातूर : सेवानिवृत्त पोलीस अधिकारी बालाजीराव काळगे व त्यांच्या पत्नीचा सौ.काळगे ताई यांचा सत्कार करताना शिवसेना नेते व राष्ट्रीय चर्मकार महासंघाचे राष्ट्रीय उपाध्यक्ष सी के मुरळीकर तसेच अनिल कबाडे जिल्हा कार्याध्यक्ष तथा भारतीय जनता पक्षाचे अनुसूचित जाती जमातीचे शहराध्यक्ष तसेच शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे विधानसभा प्रमुख लातूरचे एस.आर.चव्हाण तसेच शिवाजीराव दामावले जिल्हा उपाध्यक्ष राष्ट्रीय चर्मकार महासंघ व सेवानिवृत्त अधिकारी राज्य परिवहन महामंडळ यांच्यावतीने काळगे सेवापूर्ती कार्यक्रमात शाल, श्रीफळ, पुष्पहार देऊन योग्य सन्मान करण्यात आला.



लातूर : सेवानिवृत्तीनिमित्त पांडुरंग देडे यांचा सौ. देडे ताई यांचा त्यांच्या निवासस्थानी जाऊन शाल, श्रीफळ, बुके देऊन सत्कार करताना शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे जिल्हासह समन्वयक व राष्ट्रीय चर्मकार महासंघाचे राष्ट्रीय उपाध्यक्ष सी.के.मुरळीकर तसेच उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे विधानसभा प्रमुख लातूर शहर एस.आर.चव्हाण यांच्या वतीने सत्कार करण्यात आला व पुढील वाटचालीस हार्दिक हार्दिक शुभेच्छा देण्यात आल्या.



दयानंद विज्ञान महाविद्यालय, लातूर येथे भेट दिली असता डॉ.कोमल गोमारे यांनी राष्ट्रीय अपराध जाँच ब्यूरो नवी दिल्ली शाखा–लातूर (महाराष्ट्र) चे अधिकारी तथा पत्रकार शिरीषकुमार शेरखाने यांना कॅलेंडर भेट देण्यात आले.

# शिवाई प्रतिष्ठान या सामाजिक संस्थेकडून श्री.शिवाजी विद्यालयातील विद्यार्थ्यांना शालेय साहित्याचे वाटप

लातूर : शिवाई प्रतिष्ठान या सामाजिक संस्थेकडून श्री. शिवाजी बालक मंदिर, प्राथमिक, माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयातील गरजू व हुशार अशा २५ विद्यार्थ्यांना दरवर्षी प्रमाणे शालेय साहित्य व गणवेश देण्यात आले.




याप्रसंगी शिवाई प्रतिष्ठान अध्यक्ष उषा भोसले, उपाध्यक्ष संगीता देशमुख, सचिव जयश्री धुमाळ, सहसचिव संगीता भोसले, मनीषा माकणीकर व मनीषा काळदाते यांचा संस्थेचे सचिव श्री.जाधव व सौ .जाधव यांनी शॉल व पुष्पगुच्छ देऊन सन्मान केला. अनेक सदस्यांनी वैयक्तिकही विद्यार्थ्यांना शालेय साहित्य दिले. शिवाई प्रतिष्ठानच्या सदस्यांत संग्राम माकणीकर यांच्या स्मरणा मनीषा माकणीकर यांनी तसेच वसुधा शिंदे, यशस्वी गिरवलकर, पल्लवी जाधव, हर्षदा गोरे, अश्विनी चव्हाण यांनी विद्यार्थ्यांना शालेय साहित्य दिले.

याप्रसंगी मुख्याध्यापक कुलकर्णी सर ,शिवाई प्रतिष्ठान अध्यक्ष उषा भोसले यांची भाषणे झाली. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन पर्यवेक्षिका झिरमिरे मॅडम यांनी केले. शिक्षिका उत्तरा पंडगे, जाधव मॅडम , संध्या पाटील, रोहिणी सोनवणे, अनुराधा देशमुख, प्रिया माकणीकर, कदम ताई यांनी सहकार्य केले.

# बिर्ला ओपन माइंड्स इंटरनॅशनल स्कूलमध्ये वन महोत्सव सप्ताह निमित्ताने काढण्यात आलेल्या रॅलीला व वृक्षारोपण कार्यक्रमाला उत्स्फूर्त प्रतिसाद






लातूर : लातूर येथील बिर्ला ओपन माईंड इंटरनॅशनल स्कूलमध्ये दिनांक ०५/०७/२०२४ ला वन महोत्सव निमित्त शाळेमध्ये वृक्षारोपण करण्यात आले या कार्यक्रमासाठी या प्रमुख पाहुणे म्हणून लाभलेले सायस कराड फॉरेस्ट अधिकारी तसेच इम्रान सय्यद सर माजी नगरसेवक तसेच ग्रीन वृक्ष टीमचे सदस्य शाळेचे अध्यक्ष संभाजी सुळ सर ,सीए दिगंबर साके सर, सीए संभाजी सरडे सर ,ऍड सचिन सुळ सर, पोलीस विभागातून आलेले पोलीस उपनिरीक्षक मुळे साहेब हे सर्वजण या कार्यक्रमासाठी उपस्थित होते.

कार्यक्रमाला प्रमुख पाहुणे लाभलेले सायस कराड यांनी मुलांना मोलाचे मार्गदर्शन दिले त्यांनी मुलांना झाडांचे किती महत्त्व जीवनामध्ये आहे हे मुलांना पटवून दिले एक झाड लावल्यानंतर माणसाला किती फायदा होतो हे त्यांनी सर्व विद्यार्थ्यांना एकदम सोप्या भाषेमध्ये समजून सांगितले . प्रत्येक विद्यार्थ्यांनी कमीत कमी एक झाड लावून त्यांची संगोपन करावे हे त्यांनी मुलांना त्यांच्या भाषणामध्ये सांगितले. इम्रान सय्यद सरांनी ही त्यांच्या भाषणामध्ये झाडाचे महत्व पटवून दिले ते अनेक वर्षापासून ग्रीन वृक्ष लागवड यांच्या माध्यमातून लातूर व लातूरच्या परिसरात भरपूर प्रमाणात झाडे लावले आहेत व त्यांचे संगोपन ही करत आहेत ते त्यांच्या भाषणात त्यांनी सांगितले. अशा पद्धतीने प्रमुख पाहुण्यांनी विद्यार्थ्यांना त्यांचे मोलाचे मार्गदर्शन दिले.

तसेच शाळेच्या प्राचार्य अनिल पोल ल सरांनी प्रमुख पाहुण्यांचे आभार प्रदर्शन केले त्यानंतर प्रमुख पाहुण्यांच्या हस्ते हिरवा झेंडा दाखवून रॅलीचे आगमन केले व ही रॅली मयुर बन कॉलनी, कॉक सेट कॉलेज, अजिंक्य सिटी मार्गे, रेणापूर नाका, रिलायन्स कॉलेज, बस स्टँड नंबर दोन अशा पद्धतीने शाळेतील मुलांनी तसेच शाळेतील कर्मचारी यांनी वेगवेगळ्या ठिकाणी झाडे लावली झाडांचे महत्त्व तसेच वृक्ष लागवड करून कार्यक्रमाची सांगता शाळेमध्ये येऊन केली. कार्यक्रम यशस्वी करण्यामध्ये शाळेतील उपप्राचार्य अजय शर्मा सर तसेच शाळेचे व्यवस्थापक वैजनाथ कदम सर क्रीडा शिक्षक तसेच शाळेतील सर्व शिक्षकांनी तसेच कर्मचाऱ्यांनी खूप परिश्रम घेतले.

# लिंगायत समाजाच्या विद्यार्थ्यांनी कठोर परिश्रम करण्याची तयारी ठेवावी–प्रा.सुदर्शनराव बिरादार

उदगीर –लिंगायत समाजातील सर्व विद्यार्थ्यांनी स्वतः यशस्वी होण्यासाठी कठोर परिश्रम करण्याची तयारी ठेवावी असे मत लिंगायत महासंघाचे प्रदेशाध्यक्ष प्रा सुदर्शनराव बिरादार सर यांनी लिंगायत महासंघाच्या वतीने रविवार दिनांक ७ जुलै रोजी अहिल्यादेवी होळकर गार्डन शाहुचौक येथे आयोजित करण्यात आलेल्या गुणवंत विद्यार्थ्यांच्या सत्कार कार्यक्रमात बोलताना व्यक्त केले.




ते पुढे बोलताना म्हणाले की,शिक्षण व नौकरीत खूप स्पर्धा सुरू आहे.मुलांबरोबर आई वडिलांची सुद्धा परिक्षा असल्याचे चित्र निर्माण झाले आहे.लिंगायत मुलांना आरक्षण नसल्याने परिक्षेत जास्त मार्क्स घेऊन मेडिकल , इंजिनिअरिंगला प्रवेश मिळत नाही.प्रवेश मिळाला तर महागड्या शिक्षणाचा खर्च परवडत नाही. लिंगायत समाजाच्या आरक्षणासाठी आम्ही खुप प्रयत्न करत आहोत.

आता तर नीटसारख्या परिक्षेत घोटाळा होत आहे. धनदांडगे पेपर फ़ोडून पैशाच्या जीवावर काहीही करत आहेत. लिगायत समाजातील गरीब पालकांना या आव्हानाला तोंड द्यावे लागत आहे. अशा प्रकारे गैरमार्गाने शिक्षण क्षेत्राचे वाटोळे होऊ नये म्हणून सरकारने व प्रशासनाने काळजी घ्यावी लागेल अन्यथा परिक्षा व शिक्षणावरचा लोकांचा विश्वास उडेल. पण याही परिस्थितीत लिंगायत मुलांनी सर्व आव्हाने पेलण्यासाठी सज्ज राहिले पाहिजे.व कठोर परिश्रम करण्याची तयारी ठेवली पाहिजे .या कार्यात तुमच्या पाठीशी लिंगायत महासंघ ही संघटना कायम उभी आहे.या वर्षी तुम्ही जे परिक्षेत यश मिळवले आहे . त्याबद्दल आपले मनापासून अभिनंदन करतो,या यशात आपल्या आईवडिलांच्या सह बहिण भावासह गुरुजींचा वाटा मोठा आहे.म्हणुन त्यांचेही मी अभिनंदन करतो.व तुमच्या पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या.

लिंगायत महासंघाच्या वतीने ६० गुणवंत विद्यार्थ्यांस पालकांचाही सत्कार करण्यात आला.या वेळी शि भ प.शिवराज नावंदे गुरूजी, लिंगायत महासंघाचे जिल्हा उपाध्यक्ष बसवराज ब्याळे, शिवकुमार पाटील,दिलीप सांगावे, चंद्रकांत कोरे, शिवकुमार हसरगुंडे, रमेश अंबरखाने, पोलिस निरीक्षक सोनकवडे, विश्वनाथ मुडपे गुरूजी आदींची यावेळी समोयोचित भाषणे झाली.यावेळी लिंगायत महासंघाचे प्रदेश सरचिटणीस चंद्रकांत कालापाटील, तालुकाध्यक्ष चंद्रकांत सिरसे, लक्ष्मण रोडगे, अशोक कडोळे, रामेश्वर गोगे , शहराध्यक्ष भिमाशंकर शेळके, सुभाष शंकरे,बसवराज काला ,भरत करेप्पा, बिरादार मैडम, मुख्याध्यापिका सौ स्वामी, मुरलीधर जाधव, दिलीप बलसुरकर, श्री राम चांमले , संजय शिवशेट्टे यांच्यासह अनेक मान्यवर व संघटनेचे पदाधिकारी उपस्थित होते.हा कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी भिमाशंकर शेळके व लक्ष्मण रोडगे यांनी विशेष परिश्रम घेतले.



शेख शाहीद जलील याने नीट परीक्षेत ५८९ गुण घेऊन तसेच महाराष्ट्र शासनाच्या सीईटीच्या परीक्षेत पीसीबी ग्रुपमध्ये ९९.५६ पर्सेंटाइल गुण घेऊन उज्वल यश संपादन केल्याबद्दल चंद्रभानु सोणवने कनिष्ठ महाविद्यालयातून सर्व प्रथम आल्याबद्दल सोनवणे सरांच्या हस्ते पुरस्कार प्रदान करुन सन्मान करण्यात आला. त्याच्या या यशाबद्दल त्याचे संस्थेच्यावतीने पुष्पगुच्छ देवून सत्कार करण्यात आला.

## भावपूर्ण श्रध्दांजली




कै.जिजाबाई गंगाराम बद्दे

पुणे शहराच्या मागासवर्गीय प्रथम महिला महापौर सामाजिक बांधिलकी जपणाऱ्या आदरणीय रजनीताई त्रिभुवन यांना पुणे महानगरपालिका कामगार युनियन(मान्यताप्राप्त) च्यावतीने

## भावपूर्ण श्रध्दांजली!



हे पत्रक मुद्रक महेश मोतीराम राठोड यांनी प्रकाशक, संपादक, मालक शिरीषकुमार तुकाराम शेरखाने यांच्यासाठी मयुर प्रिंट्र्स, बी–२८, एम.आय.डी.सी., लातूर येथे मुद्रित करून ऋतूप्रेम, मुक्ताई नगर,एस.टी.वर्कशॉप पाठीमागे, अंबाजोगाई रोड, लातूर. जि.लातूर ४१३५१२(महा.) येथे प्रकाशित केले. संपादक – शिरीषकुमार तुकाराम शेरखाने, मो. : 9049844412 आर.एन.आय.नं. RNI No. : MAHMAR/2023/86200

PRINTED BY MAHESH MOTIRAM RATHOD AND PUBLISHED AND OWNED BY SHIRISHKUMAR TUKARAM SHERKHANE AND PRINTED AT MAYUR PRINTERS, B-28, M.I.D.C.,LATUR -413512 (MAHA.)AND PUBLISHED AT RUTUPREM, MUKTAINAGAR, AMBAJOGAI ROAD, BEHIND S.T.WORK SHOP LATUR DIST. LATUR - 413512 (MAH.) EDITOR : SHIRISHKUMAR TUKARAM SHERKHANE RNI No. : MAHMAR/2023/86200